ज्ञापन

कर्जत तालुक्यातील मग्रारोहयो कामांमध्ये झालेल्या अनियमितते बाबत..

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/१४४/२०२५
अहिल्यानगर दिनांक ०३/०२/२०२५

वाचा:- १. उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) जि.प.अहिल्यानगर यांचेकडील तपासणी अहवाल दिनांक १२/०६/२०२४
२. या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र.कार्या/का.व्य/मग्रारोहयो कक्ष/२५७/२०२४ दिनांक १३/१२/२०२३
३. श्री सय्यद जमीर ख्वाजा, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कर्जत यांचा खुलासा दिनांक ०४/०७/२०२४

श्री सय्यद जमीर ख्वाजा, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कर्जत, येथे कनिष्ठ सहाय्यक या पदावर कार्यरत असताना त्यांच्याकडे पंचायत समिती कर्जत अधिनस्त मग्रारोहयो कक्षाकडील कार्यभार सोपविणेत आलेला होता. श्री सय्यद यांचेकडील मग्रारोहयो कक्षाकडील संपुर्ण कार्यभाराची दप्तराची तपासणी करणेत आलेली होती. संदर्भ क्रमांक १ नुसार तपासणी अहवाल प्राप्त झालेला होता. सदर तपासणी अहवालानुसार तपासणीमध्ये आढळुन आलेल्या अनियमितते बाबत श्री. सय्यद यांना संदर्भ क्रमांक २ अन्वये १ ते ५ मुद्यांबाबत कारणे दाखवा नोटीस बजावणेत आलेली होती.

संदर्भ क्रमांक ३ अन्वये श्री सय्यद अंतिम कारणे दाखवा नोटीसीचा खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलाशाचे अवलोकन केले असता श्री. सय्यद यांनी सादर केलेला खुलासा हा कारणे दाखवा नोटीशीमधील मुद्यानुसार संयुक्तीक तसेच समाधानकारक असलेचे दिसुन येत आहे. तरी श्री सय्यद यांचा खुलासा मान्य करणेत येते असुन भविष्यात श्री सय्यद यांचेकडुन अशा प्रकारे अनियमितता होणार नाही म्हणुन श्री सय्यद यांना सक्त ताकीद देणेत येत आहे.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२५०२०३०४००१५ असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 24-02-2025 11:25:08
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री सय्यद जमीर ख्वाजा, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कर्जत
द्वारा:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत

प्रत:- उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो( जि.प.अहिल्यानगर

प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत

२/-सदर ज्ञापन संबंधितास बजावणेत येऊन ज्ञापन बजावले बाबत पोहोच इकडेस सादर करावी.